


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १४४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०६ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्राला हादरवणारा सशस्त्र दरोडा, ७ दरोडेखोर गजाआड !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, रायगड :** अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील कुचलुकु पोल्ट्री फार्मचे मालक कुणाल दिलीप पाथरे यांच्या घरावर झालेल्या धडाकेबाज सशस्त्र दरोड्याचा पोलिसांनी अवघ्या काही तासांत पर्दाफाश केला आहे. सात आरोपी ताब्यात घेण्यात आले आहेत. ही कारवाई अलिबाग पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या संयुक्त प्रयत्नातून यशस्वी ठरली. या यशस्वी कारवाईमुळे रायगड पोलिसांच्या कार्यक्षमतेचा नागरिकांना पुन्हा एकदा प्रत्यय मिळाला आहे.

संबंधित दरोड्याची घटना ही शनिवारी (३ जानेवारी) मध्यरात्री घडली होती. कुणाल पाथरे यांच्या घरावर दरोडेखोरांनी सशस्त्र हल्ला केला. घरातील काही सदस्यांना डांबून ठेवण्यात आले, तर पेट्रोल अंगावर टाकून जीवे ठार करण्याची धमकीही दिली. दरोडेखोरांनी घरातील दागिने आणि रोकड असा एकूण १८ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. घटनेची गंभीरता ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत फर्णे यांच्याकडे तपास सोपविण्यात आला.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या पथकाने सीसीटीव्ही कॅमेरे, स्थानिक माहिती आणि इतर साधनांचा वापर



करून आरोपींचा शोध घेतला. अवघ्या काही तासांत सात आरोपी पकडण्यात आले आणि त्यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. प्राथमिक चौकशीत समोर आले की, आरोपी भिवंडी परिसराशी संबंधित आहेत.

सध्या पोलिसांकडून आरोपींची ओळख परेड घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. चोरीच्या ऐवजाच्या बाबतीत चौकशी केली जात आहे. त्यामुळे अद्याप आरोपींची नावे उघड करण्यात आलेली नाहीत. पोलीस प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे आणि अशा घटनांबाबत तत्काळ माहिती पोलीस ठाण्यात देण्यास सांगितले आहे.

अलिबाग पोलीस आणि गुन्हे अन्वेषण शाखेच्या जलद प्रतिसादामुळे दरोडेखोरांचा शोध घेणे शक्य झाले. स्थानिक पोलिसांच्या संघटीत आणि नियोजनबद्ध कारवाईमुळे अवघ्या काही तासांत प्रकरण उघडकीस आले, ज्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत विश्वास वाढला आहे. स्थानिकांनीही या कारवाईचे स्वागत केले असून भविष्यात अशा गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

याशिवाय, पोलिसांनी घरच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना मजबूत करण्याचा सल्ला दिला आणि नागरिकांना सतत जागरूक राहण्याचे आवाहन केले. या घटनेतून स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा आणि गुन्हे अन्वेषणातील जलद प्रतिसादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला आहे. म ापगाव प्रकरणातून हेही स्पष्ट झाले की, पोलीस प्रशासनाने तत्परतेने कारवाई केली तर गुन्हे लवकर उघडकीस येऊ शकतात आणि नागरिकांचे सुरक्षिततेचे समाधान करता येते.

# लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी,
# लाभार्थी महिलांचं ते सर्वात मोठं टेन्शन दूर...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** ज्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिंलासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दर महिन्याला १ हजार ५०० रुपये सन्मान निधी म्हणून दिले जातात. दरम्यान राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे.

आधी नगरपरिषद आणि नगर पंचायत निवडणुकीची आचारसंहिता सुरू होती, आणि त्यानंतर महापालिका निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाली त्यामुळे नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी महिल्याचे पैसे रखडले होते, मात्र त्यापैकी नोव्हेंबर महिन्याच्या हाप्त्याचं वितरण लाभार्थी महिलांना करण्यात आलं आहे. तर डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे पैसे




देखील लवकरच मिळणार असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान राज्यात अशा देखील अनेक महिला आहेत, ज्या या योजनेसाठी पात्र नसून देखील त्यांनी लाडक्या बहीण योजनेचा लाभ घेतला आहे, अशा महिलांची नाव लाभार्थी यादीतून वगळण्यासाठी आता सरकारने या योजनेसाठी ई केवायसी प्रक्रिया सुरू केली होती. या योजनेसाठी केवायसी करण्याची शेवटची तारीख ही ३१ डिसेंबर २०२५ होती.

मात्र तारीख उलटून गेल्यानंतर देखील अनेक महिलांची केवायसी अद्यापही बाकी आहे, अशा म हिलांना आता या योजनेचा लाभ बंद होणार असल्याची शक्यता आहे. ज्या महिलांनी केवायसी केली नाही त्या महिलांची नावं यादीतून वगळली जाणार आहेत, तसेच ज्या महिला पात्र नसून देखील या योजनेचा लाभ घेत आहेत अशा महिलांची नावं देखील या योजनेतून वगळण्यात येणार आहेत.

सरकारने या योजनेसाठी केवायसी सुरू केल्यानंतर आणि आधी देखील काही महिलांची नाव या योजनेतून वगळण्यात आली होती. तेव्हापासून ही योजना बंद होणार असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे, त्यामुळे ही योजना खरच बंद होणार का? असा प्रश्न लाडक्या बहिणींना देखील पडला आहे, त्याचं उत्तर आज जालन्यात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच लाडक्या बहिणींना लखपती दीदी करणार असल्याची घोषणा देखील त्यांनी यावेळी केली.

## मध्यरात्री दरवाजा तोडून घरात दरोडेखोर शिरले...
## महिलेसोबत जे केलं ते...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, बीड :** आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या सराटेवडगाव येथे रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास दरोडेखोरांनी धुमाकूळ घातला. घराचा दरवाजा लाथ मारून तोडत आत शिरलेल्या ५ ते ६ अज्ञात दरोडेखोरांनी महिलांच्या गळ्यावर पाय देऊन आणि धारदार शस्त्राचा धाक दाखवून दोन भावांच्या कुटुंबांना लुटले. या भीषण घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सराटेवडगाव येथील शेळके वस्तीवर ग्यानबा राजपुरे आणि बाळू राजपुरे हे दोन भाऊ आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. रविवारी त्यांच्या घरी चुलत्याचे वर्षश्राद्ध असल्याने नातेवाईक आणि पाहुण्यांसाठी जेवणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दिवसभर पाहुण्यांची वर्दळ असल्याने कुटुंब थकलेले होते. रात्री सर्व आटपून दोन्ही कुटुंबे गाढ झोपेत होती. मध्यरात्री एक ते सव्वा एकच्या सुमारास अचानक पाच ते सहा अज्ञात दरोडेखोरांनी ग्यानबा राजपुरे यांच्या घराचा दरवाजा लाथा मारून तोडला. अचानक झालेल्या आवाजाने घरातील सर्वजण जागे झाले. ग्यानबा यांच्या आईने प्रतिकार करण्याचा किंवा ओरडण्याचा प्रयत्न केला असता, क्रूर दरोडेखोरांनी त्यांच्या छातीवर आणि गळ्यावर पाय देऊन त्यांना जमिनीवर दाबून धरले.

**शस्त्राचा धाक आणि लूट !**

दरोडेखोरांकडे धारदार शस्त्रे होती. त्यांनी पती-पत्नीच्या कपाळाला शस्त्र टेकवून जीवे मारण्याची धमकी दिली आणि अंगावरील दागिने ओरबाडून घेतले. ग्यानबा यांच्या घरातून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्यानंतर, चोरट्यांनी आपला मोर्चा शेजारीच राहणाऱ्या बाळू राजपुरे यांच्या घराकडे वळवला. तिथेही घरातील सदस्यांना मारहाण करून लूटमार करण्यात आली.

# नैताळे यात्रेत चोरी करणारा आरोपी अवघ्या दोन तासांत जेरबंद
## निफाड पोलिसांची धडाकेबाज कारवाई; भाविकांतून समाधान



> यात्रोत्सवाच्या काळात भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. चोरीच्या घटनेची तात्काळ दखल घेऊन तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या दोन तासांत आरोपीस अटक करण्यात आली आहे. यात्रेत गैरप्रकार करणाऱ्यांविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहील.
>
> **- मा.गणेश गुरव**
> **पोलिस निरीक्षक**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री म तोबा महाराज यांच्या नैताळे येथील यात्रोत्सवात गर्दीचा गैरफायदा घेत चोरी करणाऱ्या आरोपीस निफाड पोलिसांनी अवघ्या दोन तासांत जेरबंद करून प्रभावी कारवाई केली. या वेगवान कामगिरीमुळे यात्रोत्सवात चोरी करणाऱ्या चोरट्यांना चांगलाच पायबंद बसला असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

फिर्यादी पुजा सचिन आहेर (वय २८) या आपल्या मुलगी धनवीसह दि.४ जानेवारी रोजी नैताळे यात्रेसाठी आल्या होत्या. यावेळी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुम ारास मतोबा मंदिरासमोर ग्रामपंचायत कार्यालयाजवळ गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या मुलीच्या गळ्यातील अंदाजे ७ हजार रुपये किंमतीचे सुमारे ७०० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे ओमपान चोरून नेले. या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात गु.र.न. ०५/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३(२)(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात्रेच्या दुसऱ्याच दिवशी रविवार असल्याने मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती, त्यामुळे आरोपी पकडणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखत तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या दोन तासांत आरोपी रवी पिराजी मांजरे (वय ३७, रा. गणेशवाडी, भाजीम ार्केट परिसर, पंचवटी, नाशिक) यास ताब्यात घेण्यात आले.

सध्या आरोपी निफाड पोलिसांच्या ताब्यात असून पुढील तपास पोलीस हवालदार पो. हवा शिंदे करीत आहेत. निफाड पोलिसांच्या या जलद आणि परिणामकारक कारवाईचे भाविकांसह नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# मुंबईत सुमारे अडीच कोटींची रक्कम सापडली !
# भरारी पथकाची मोठी कारवाई...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** राज्यातील महानगर पालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या आचारसंहिता सुरू आहे. त्यामुळे राज्यातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक भरारी पथके नेमण्यात आलेली आहेत. अशाच एका भरारी पथकाने मुंबईच्या देवनार परिसरातून २ व्हॅनमधून २ कोटी ३३ लाखांची रोकड ताब्यात घेतली आहे. त्यामुळे मुंबईत खळबळ उडाली आहे. ही रक्कम कशासाठी आणि कुठून आली याबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित होत आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**निवडणूक भरारी पथकाची कारवाई**

निवडणूक भरारी पथकाने मुंबईच्या देवनार परिसरातून २ व्हॅनमधून २ कोटी ३३ लाखांची रोकड ताब्यात घेतली आहे. ही रोकड अढच् मध्ये भरण्यासाठी नेली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र या रकमेबाबत संशय



असल्यामुळे या पैशांची माहिती आयकर विभागाला देण्यात आली असून पुढील तपास आयकर विभागाकजे सोपवण्यात आला आहे. सध्या ही रोकड देवनार पोलिसांकडे कस्टडी म्हणून ठेवण्यात आली असून ही रोकड कुठून कुठे नेली जात होती याची माहिती घेतली जात आहे.

**आयकर विभाग चौकशी करणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, पोलिसांना या रकमेबाबत संशय आहे. सध्या निवडणूक असल्यामुळे पैशांचा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता आहे. यावर बारीक नजर ठेवली जात आहे. संशयित वाहनांची कसून चौकशी केली जात आहे. अशाच एका कारवाईत ही रक्कम आढळली आहे. या पैशांची पुढील चौकशी आयकर विभाग करत आहे. देवनार पोलिसांनी या घटनेची नोंद स्टेशन डायरीत केली असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

**राज्यातील विविध ठिकाणी नाकाबंदी**

मुंबईसह राज्याच्या विविध भागात सध्या भरारी पथके तैनात करण्यात आलेली आहे. तसेच प्रमुख शहरांच्या प्रवेशद्वारावर नाकाबंदी करण्यात आली असून शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांची कसून चौकशी केली जात आहे. याचे कारण म्हणजे मतदानाच्या आणि प्रचाराच्या काळात राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणात पैशांचा वापर होण्याची शक्यता आहे. मतदारांना पैशांचे आमिष दाखवले जाण्याची शक्यता आहे. त्याम ुळे राज्यातील विविध ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली असून अशा गोष्टींना आळा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला.

विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते.



वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले.

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लोकशाहीचा चौथा 'स्तंभ'

६ जानेवारी हा राज्यातील पत्रकारितेच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो, जगात, देशात किंवा महाराष्ट्रात पत्रकारितेचा मोठा इतिहास आहे. दरवर्षी ३ मे रोजी जागतिक पत्रकार दिवस तर १६ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय प्रेस डे म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी १८३२ साली आद्य पत्रकार कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी त्यांच्या जन्मदिनी दर्पण नावाचे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले, त्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र सरकारने आजचा दिवस पत्रकार दिन म्हणून घोषित केला.

भारतीय पत्रकारितेचा इतिहास खुप जुना आहे १७७६ मधे भारतात इंग्रजी पहिल्यांदा वृत्तपत्र प्रकाशित झाले. वृत्तपत्र आणि अलीकडच्या काळातील इलेक्ट्रॉनिक मिडिया च्या माध्यमातून समाजाला ज्ञान, खेळ, क्रिडा, करमणूक, सामाजिक घडामोडींची माहिती, समाजातील वाईट, चुकीच्या प्रथा, परंपरा, यावर भाष्य करणे, 'राजा तु चुकला' असे परखड मत मांडत समाजाच्या जागल्या च्या भुमिकेतुन वृत्तपत्रे आणि मिडिया काम करत असतात,आणि यात महत्त्वाची भूमिका बजावतात ते पत्रकार. यामुळेच वृत्तपत्रे आणि अलीकडच्या काळातील इलेक्ट्रॉनिक मिडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो. आजवर समाजाच्या, देशाच्या वाटचालीत पत्रकारितेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि आजही बजावत आहे. मात्र याच पत्रकारितेवर मोठे प्रश्नचिन्ह देखील निर्माण झाले आहे, आणि इतर श्रेत्राप्रमाणे पत्रकारितेत देखील काही दुष्प्रवृत्तीं शिरल्या आहेत मात्र आजही जनता पत्रकारितेकडे अपेक्षेने पहाते. समाजाला दिशा देण्यात, अन्यायाला वाचा फोडण्याचे, न्यायाच्या बाजुने रहाणारे आजही अनेक पत्रकार आपले कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडत आहेत. पत्रकाराच्या लेखणीची एक वेगळीच धार आहे, लेखणीत ताकद असते, हे अनेकदा अधोरेखित झाले आहे, अगदी आणिबाणीच्या काळात देखील काही वृत्तपत्रे, पत्रकार यांनी सरकारच्या ताकदीपुढे मान झुकवली नाही.

वास्तविक पत्रकारिता ही सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून, निस्वार्थीपणे आणि निर्भिडपणे स्वेच्छेने स्विकारलेली व्रत आहे,मात्र कालानुरूप सगळेच संदर्भ बदलले आहेत आणि पत्रकारितेवर देखील अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पत्रकारिता देखील राजकीय पक्ष, नेते, जात, पात, धर्म, पंथ, गट-तट यात विभागली गेली आहे, अनेकजण प्रलोभनाला बळी पडत आहे त्यामुळे पाकिट संस्कृती फोफावली आहे, अनेक पत्रकार तोडपाणी चा नसता उद्योग करुन पत्रकारिता बदनाम क री त आहेत,तर पत्रकारिता हा काहींसाठी पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे,तर




पत्रकारितेतील काही राजकीय पक्षांची प्रचार पत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया हा जणु एखाद्या राजकीय पक्षाचा प्रवक्ता बनला आहे हे कटु वास्तव आहे. यामुळेच गेल्या काही वर्षांपासून पत्रकारितेत'गोदी मिडिया ', बिकाऊ मिडिया, हे वाक्प्रचार ऋढ झाले आहेत. वर्तमान पत्र वा एखादे चॅनल चालविणे हे खर्चिक झाले आहे त्यामुळे मिडिया हा पैसे वाल्यांच्या हातात जात आहे आणि अनेक उद्योगपती, कार्पोरेट कंपन्यानी मिडीयावर कब्जा केला आहे आणि त्यामुळे विकाऊ पत्रकारिता मोठ्याप्रमाणावर फोफावत आहे. सगळा पैशाचा खेळ बनला आहे आणि सगळी सोंगे वठविता येतात पण पैशाचे सोंग कुणालाही वठविता येत नाही हे ही तितकेच खरे आहे. पत्रकारांनी सरकारला प्रश्न विचारला पाहिजे, विविध प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे, मात्र आजच्या घडीला चित्र काहिसे वेगळे दिसते.

तर वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक मिडिया यांचा आर्थिक ताळमेळ बसतांना सरकारची मर्जी, जाहिराती, सोयीसुविधा यांचा विचार करावाच लागतो हे देखील तितकेच खरे आहे. असे असले तरीही आज अनेक पत्रकार आपली जबाबदारी ओळखून पत्रकारितेच्या धर्माला जागुन, कोणतीही अपेक्ष न बाळगता कुठल्याही आर्थिक लोभाची अपेक्षा न ठेवता, सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून काम करत आहेत. पत्रकारांना ना कुठला आर्थिक मोबदला मिळतो ना सामाजिक सुरक्षा. समाजाला, जनतेला पत्रकारितेकडुन फार अपेक्षा आहेत, जनतेच्या प्रश्नावर पत्रकारांनी लढावे, त्यांनीच समस्या मांडाव्यात, त्यांनीच व्यवस्थेशी झगडावे, सरकारशी लढावे ही जनतेची रास्त अपेक्षा आहे आणि अनेक पत्रकार हे आपले तन मन धन अर्पण करून आपले आयुष्य खर्ची घालतात देखील. मात्र अनेकदा समाजातील वाईट प्रवृत्तीं कडुन, व्यवस्थेकडून पत्रकारांना लक्ष केले जाते, अनेकदा पत्रकारिता जिवावर देखील बेतते, अशावेळी समाजाने, जनतेने देखील अशा पत्रकारांच्या पाठिशी उभे राहुन त्यांना बळ देणे गरजेचे आहे. पत्रकार संरक्षण कायदा आहे मात्र त्याचा फायदा होतांना दिसत नाही.आज अनेक लहान वृत्तपत्रे, युट्यूब चॅनल च्या माध्यमातून पत्रकारिता पुढे नेण्याचा प्रयत्न अनेकजण आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत.अशाही परिस्थितीत आज अनेक पत्रकार काम करीत आहेत आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सरकार तर्फे तसेच अनेक सामाजिक संस्था, वृत्तपत्रात संस्था यांच्या कडुन अनेकांना सन्मानित करुन त्यांच्या पाठिवर कौतुकाची थाप मारली जाते आणि पत्रकारांसाठी ती फार प्रेरणादायी ठरते. इंदोर येथे झालेल्या दुर्घटनेबाबत अनुराग द्वारी या पत्रकाराने मंत्री कैलास विजयवर्गिय यांना काही प्रश्न विचारले तेव्हा त्यांनी त्याला अपशब्द वापरले मात्र त्याने तिथल्या तिथेच विजयवर्गिय यांना खडेबोल सुनावले, त्यामुळेच इंदोर ची दुर्घटना राष्ट्रीय बातमी झाली.

आजच्या घडीला लोकशाहीच्या संसद, कार्यपालिका,, न्यायव्यवस्था, आणि प्रिंट तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया हे चारही स्तंभ डळमळीत झाले आहेत, हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आणि नुकसानकारकच आहे. मात्र पत्रकारिते कडुन अजुनही अपेक्षा आहे. पत्रकारिता ही समाजाच्या जागल्याच्या भुमिकेतुन घेतलेले एक व्रत आहे. कै. बाळशास्त्री जांभेकर यांचा स्मृतीदिन साजरा होत असतांना, निष्पक्षपातीपणे, निर्भीडपणे, पत्रकारिता व्हायला हवी आणि त्यासाठी पत्रकारांनी आपली बांधिलकी समाजाशी आहे हे ओळखून पत्रकारितेचे व्रत एक कर्तव्य म्हणून निभावले पाहिजे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# मुंबईत मराठीचा प्रश्न महत्वाचा ठरणार का ?




महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा एक भाग म्हणून मुंबईत महायुतीचा हिंदू मराठी महापौर होणार असे विधान करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील मराठी मतदारांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला असला तरी गेल्या काही महिन्यांत मुंबई आणि ठाण्यात मराठीच्या मुद्यावर झालेल्या वादात भाजपने हात आखडता घेतला होता याची जाणीव मंबईकरांना आहेच. शिवसेनेत पडलेली उभी फूट आणि शिंदे सेनेचे मुंबईत वाढत चाललेले प्राबल्य मुंबईत महायुतीसाठी जमेची बाजू असली तरी महाविकास आघाडीत मराठीला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा प्रवेश झाल्याने मराठीच्या बाबतीत तरी महाविकास आघाडीचे पारडे जड झालेले आहे. मुंबईतून घटत चाललेला मराठी टक्का, मुंबईत वाढत चाललेले परप्रांतीयांचे लोंढे, त्यामुळे मूलभूत सोयी सुविधांच्या पुरवठ्यावर पडणारा अतिरिक्त भार, मुंबईला आलेले बकाल स्वरूप, शहरात वाढलेली गुन्हेगारी, मराठी माणसांना मिळणारी हीन वागणूक, मराठी शाळांना लागलेली घरघर, या प्रश्नांवर तोडगा काढण्यास विद्यमान राज्य सरकार सपशेल फेल ठरलेले आहे, त्यामुळे मुंबईत तरी मराठीचा मुद्दा महाविकास विकास आघाडीसाठी हुकमी एक्क्याचे काम करणार आहे. मुंबई वगळल्यास देशभरात एकही शहर नसेल ज्याच्या महापालिकेत तेथील स्थानिक भाषिकांव्यतितिरिक्त परप्रांतीयांना निवडणुकीत उमेदवारी दिली जाते आणि निवडून आणले जाते. मग मुंबईतच परप्रांतीयांची दादागिरी कशासाठी ? १०६ हुतात्म्यांच्या बलिदानातून आणि सहस्रो मराठी कुटुंबियांच्या त्यागातून महाराष्ट्राला मुंबई राज्याची राजधानी म्हणून प्राप्त झाली आहे आज सुधारणांच्या नावाखाली तिला महाराष्ट्रापासून तोडण्याचा घाट घातला जात असेल तर त्याला कडाडून विरोध झालाच पाहिजे. मराठी माणसांनी आज या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तर काही वर्षांनी मुंबईत मराठी माणूस नावालाही शिल्लक राहणार नाही. मराठीचे भविष्य सांगणारा भरत जाधव याचा एक व्हिडियो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये मराठीचे प्रतीकात्मक रूप असलेला भरत जाधव अन्य प्राण्यांप्रमाणे प्राणिसंग्रहालयात लोकांना दाखवण्यासाठी ठेवण्यात आलेला दिसून येतो. कधीकाळी ज्याला मुंबई आपली वाटत होती तोच मराठी माणूस मुंबईतून हद्दपार झाल्याने भविष्यातील पिढीला अन्य वन्यजीवांप्रमाणे तो दाखवण्यासाठी पिंजऱ्यात ठेवलेला पाहायला मिळतो. मराठीला गांभीर्याने न घेणाऱ्या मराठी भाषिकांच्या आणि मराठी राजकारण्यांच्या डोळ्यांत अंजन घालणारा सदर व्हिडीओ मराठीची होत असलेल्या दुर्दशेकडे बोट दाखवणारा आहे. भविष्यात ही स्थिती यायला नको म्हणून मराठी माणसांनी मराठीसाठी जागृत होणे गरजेचे आहे.

आजमितीला राज्यात अनेक ठिकाणी झपाट्याने शहरीकरण होत चालले आहे. शहरीकरणासोबत उद्योगधंद्याची साधनेही निर्माण होतात आणि त्यासोबतच अशा ठिकाणी नोकरी व्यवसायासाठी परप्रांतीय येऊन आपले बस्तान मांडू लागतात. सकाळी ९ ते ५ नोकरी करून उरलेला वेळ कुटुंब, मित्रमंडळी यांमध्ये व्यतीत करणाऱ्या मराठी माणसांना व्यवसाय करण्यात अधिक रुची नसल्याने परप्रांतीयांचे फावते. लहानमोठे उद्योग करून ही माणसे मराठी माणसांच्या जीवावर इथेच मोठी होतात. नोकऱ्यांमध्ये कमी वेतनात अधिकाधिक काम करून ही मंडळी मालकांची मने जिंकण्यातही तरबेज असतात. शिवाय मराठी माणसांच्या तुलनेत अनावश्यक खर्च करण्यात ही दोन हात मागे असल्याने कमी काळात अधिक पैसा गोळा करण्यात यांचा हातखंडा असतो. मराठी माणसांना जिथे आयुष्यभर राबून मुंबईत स्वतःचे घर घेता येत नाही त्याच मुंबईत ही मंडळी पै पै वाचवुन सुरुवातीला भाड्याने आणि कालांतराने चांगल्या सोसायट्यांमध्ये स्वतःची घरे घेतात. गेल्या काही वर्षांत मुंबईतील मराठी माणसांचा टक्का झपाट्याने घसरत चालला आहे. ऐश आरामाची सवय असलेला मराठी माणूस आपली घरे गुजराती, मारवाडी अथवा युपी बिहाऱ्याला विकून स्वतः बदलापूर, कर्जत, कसारा, वांगणी यांसारख्या ठिकाणी इमारतींमध्ये वसू लागला आहे. मुंबईचे घर विकून आलेले गडगंज पैसे बँकेत ठेवून व्याजावर जगू लागला आहे. मुंबईचे हे लोण हळूहळू ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई मध्येही पसरायला लागले आहे. परप्रांतीयांची टक्केवारी वाढू लागल्याने त्यांची मुजोरीही वाढू लागली आहे याचा प्रत्यय आज अनेक ठिकाणी दिसून येतो. मराठी माणसांना घर, दुकान भाड्याने न देणे, मराठी मुलांना नोकरीला न ठेवणे, मराठी माणसांना मोठ्या हॉटेलांत प्रवेश न देणे, शेजारी राहणाऱ्या मराठी कुटुंबाशी लहान सहान कारणांवरून वाद घालणे यांसारख्या घटना अधूनमधून उजेडात येतात आणि मग मराठी आणि परप्रांतीय वाद निर्माण होऊन वातावरण ढवळून निघते.काही दिवसांनी हे वाद क्षमतात. लोकही विसरून जातात आणि पुन्हा आपापल्या कामाला लागतात. मराठी माणसांची हेटाळणी करणारी, मराठी भाषिकांचा अवमान करणारी त्यांना भाषेवरून शिवीगाळ करणारी जी प्रकरणे उजेडात येतात त्यापेक्षा कितीतरी प्रकरणे शहरी भागांत प्रतिदिन घडत असतात. नोकरी करणाऱ्या मराठी माणसांना त्यांच्या परप्रांतीय मालकांकडून हीन वागणूक दिली जाणे हे तर नित्याने सर्वत्रच घडत असते. नोकरी टिकवण्यासाठी हा अवमान मराठी माणूस सुद्धा निमूटपणे सहन करत असतो.

चारी पातशाह्यांना पायाशी लोळण घ्यायला लावणारा, जगावर राज्य गाजवणाऱ्या इंग्रजांच्या उरात धडकी भरवणारा, स्वराज्याची भगवी पताका अटकेपार फडकावणारा, दिल्लीचे तख्त राखणारा मराठी माणूस आज आपली अस्मिताच विसरला असल्याने आज त्याच्यावर ही नामुष्की ओढवली आहे. 'मुंबई मराठी माणसाची आहे, कोणाच्या बापाची नाही त्यामुळे इथे आवाजही मराठी माणसाचाच असायला हवा' असे हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे नेहमी ठणकावून सांगत. मराठी माणसांच्या न्यायहक्कासाठी आणि त्यांना मुंबईत मानाने जगता यावे यासाठी शिवसेना या पक्षाची स्थापना केली. राजकारणापेक्षा समाजकारणाला प्रथम प्राधान्य देणाऱ्या शिवसेनेने मुंबईत मराठी माणसाचा आवाज बुलंद केला. आज तोच आवाज कुठेतरी हरवत चालला होता. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती केल्याने मुंबईतील मराठी माणसाच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. येत्या महानगर पालिका निवडणुकीत मुंबईतील मराठी माणूस मराठीच्या मुद्यावर महायुतीच्या झोळीत मतांचे दान टाकणार कि मुख्यमंत्र्यांच्या मुंबईला मराठी महापौर देण्याच्या आश्वासनाला जागणार हे येत्या १६ तारखेलाच कळणार आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## मानपाडा पोलिसांची कारवाईगावठी कट्टा व जिवंत काडतूससह आरोपी अटकेत



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०५, डोंबिवली (ठाणे) :** दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री २२.३० वाजण्याच्या सुमारास मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलिसांना गुप्त बातमीदार मार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. एका इसमाकडे गावठी बनावटीचा कट्टा असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. सपोनि संपत फडोळ, सपोउनि पवार, पोहवा मासाळ, पोहवा पाटील, पोशि आहेर, पोशि आव्हाड व पोशि शेळके यांच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे यासीन जमील खान (वय ३० वर्षे), रा.बाळा भाणे चाळ, रूम नं.१, आडीवली गाव, पिसवली, कल्याण पूर्व, जि. ठाणे यास शिताफीने ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीकडून

**एक देशी बनावटीचा लोखंडी गावठी कट्टा (किंमत अंदाजे १०,००० रुपये),**

**पिवळ्या धातूच्या कॅप असलेली २ जिवंत काडतूस (किंमत ४०० रुपये)** असा एकूण १०,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीस दिनांक २६/१२/२०२५ रोजी रात्री ००.४५ वाजता, ठाणे दैनंदिनी नोंद क्र. ०२ अन्वये अटक करण्यात आली आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुबरे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण) श्री.जाधव, पोलीस उपआयुक्त परिमंडळ - ०३ अतुल झेंडे व सहा.पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या म ार्गदर्शनाखालीवपोनि / संदीपान शिंदे, सपोनि / संपत फडोळ, सपोउनि/पवार, पोहवा / मासाळ, पोहवा / पाटील, पोशि/आहेर, पोशि/आव्हाड, पोशि/शेळके यांनी केली.

## हमरापुर विभाग ते पाली पायी पदयात्रा



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील हमरापुर विभागातील हमरापूर विभाग श्री गणेश उत्कर्ष मंडळ यांच्यातर्फे पाली पायी पदयात्रचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी हमरापुर विभाग श्री गणेश मूर्तिकार उत्कर्ष मंडळ तर्फे विभागातून पायी पदयात्रा पाली माझी येथील श्री गणेश बलालेश्वराच्या चरणी मंदिरा पर्यंत नेले जाते. त्याप्रमाणे यावर्षीही सोमवारी सदर पदयात्रा निघाली असून मुंबई गोवा महामार्गेवरून सोमवार, दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी नागोठणे परिसरात वस्ती केल्यानंतर मंगळवार, दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी अंगारकी संकष्टीच्या दिवशी सदर यात्रा पाली येथील श्री बालाजी मंदिरात पोचणार आहे. तेथे मंदिरात श्री बल्लारश्वेर बाप्पाचे दर्शन केल्यानंतर पुन्हा सर्व पदयात्री हमरापुर विभागात परततील अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष सचिन पाटील यांनी बोलताना दिली. सदर पायी पदयात्रेत हमरापुर विभाग श्री गणेश मूर्तिकार उत्कृष्ट मंडळाचे अध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष सुनील मोकल, खजिनदार सत्यजित पाटील, सचिव रवींद्र पाटील, माजी अध्यक्ष कुणाल पाटील, जयेश पाटील, किशोर पाटील, कृष्णा गोलिमडे, देविदास नाईक, सतीश पाटील (कळवे), प्रकाश भगत, नितीन मोकल, बल्लाळ पाटील, मितेश पाटील यांच्यासह शेकडो मूर्तिकार सहभागी झाले आहेत.

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्कॉदो स्पर्धेत राज घुले, आर्यन येवले यांचे सर्वोत्कृष्ट यश






**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०५, मुंबई :** आंतर विद्यापीठ तायक्कॉदो स्पर्धा चिपळूण रत्नागिरी येथे दिनांक ०३ ते ०५ जानेवारी २०२६ रोजी डॉ.तात्यासाहेब नातू महाविद्यालय आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज चिपळूण रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठातून मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यातील अनेक म हाविद्यालयातील तायक्काँदो खेळाडूंनी सहभाग घेण्यात आला होता. मुलांच्या वजनी गटाम ध्ये राज संजय घुले याने सुवर्णपदक आणि आर्यन संदिप येवले याने रौप्यपदक पटकावत सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठातून राज घुले व आर्यन येवले यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. हे दोघे गुरुनानक खालसा कॉलेज, माटुंगा येथे शिकत असून प्रशिक्षक राजेश मुरव, संदिप येवले यांचे त्यांना मार्गदर्शन मिळत आहे. डॉ.मनोज रेड्डी (स्पोर्ट्‌स डायरेक्टर, मुंबई विद्यापीठ), डॉ.बाळासाहेब यादव मुख्याध्यापक, मधुकर चव्हाण, व्यंकटेश कररा (तायक्कॉदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई) यांच्या हस्ते स्पर्धे चे उद्घाटन करण्यात आले व विजयी खेळाडूंना मेडल देऊन गौरविण्यात आले आहे.

## मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी मनपाच्या सर्व विभागाचा घेतला सुक्ष्म आढावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूरच्या सार्वत्रिक निवडणूक - २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी मुख्य निवडणूक निरीक्षक विजय भाकरे यांनी सर्व संबंधित विभागांचा सविस्तर आढावा घेतला. चंद्रपूर महानगरपालिका स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत निवडणूक तयारी, नियोजन व अंमलबजावणीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, भा.प्र.से, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकाडे, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त संदीप चिद्रावार, प्रादेशिक परिवहन अधिकारी, किरण मोरे, पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी




तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश यांनी निवडणूक विषयक आतापर्यंत करण्यात आलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती पावर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे सादर केली. त्यानंतर मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी प्रत्येक विभागाचा सूक्ष्म आढावा घेत सर्व यंत्रणांना समन्वयाने काम करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी सांगितले की, निवडणूक कामकाजात येणाऱ्या अडचणी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने तातडीने सोडवाव्यात. मागील निवडणुकीतील मतदान टक्केवारीपेक्षा अधिक मतदान या निवडणुकीत होईल. यासाठी प्रभावी नियोजन करावे. गरज भासल्यास लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांच्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती करावी. निवडणूक विषयक सर्व माहिती, मतदान व मतमोजणी प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती सामान्य नागरिक, राजकीय पक्ष व उम ेदवारांना वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. कोणत्याही प्रकारे निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणार नाही, याची दक्षता घ्यावी व संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. मतदान व मतमोजणीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच निवडणूक प्रक्रियेत सहभागी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा निवडणूक आयोगाचा प्रतिनिधी असल्याने त्यांच्याकडून कोणतेही अशोभनीय वर्तन होणार नाही, याची कटाक्षाने अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले. मतदान यंत्रे व इतर सर्व निवडणूक साहित्य १०० टक्के कार्यक्षम असल्याची खात्री करावी. नागरिकांना किती उमेदवारांना मतदान करावयाचे आहे, याची स्पष्ट माहिती द्यावी. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

## श्रमिक महिला पतसंस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०५, धाराशिव :** असंघटित श्रमिक महिलांच्या विकासासाठी सरकारच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. महिला प्रत्येक क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. श्रमिक महिलांनी सहकारच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबी व्हावे. त्यासाठी श्रमिक महिलांच्या पतसंस्था ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष नंदकुमार गवारे यांनी केले.

श्रमिक महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या नवीन कार्यालयाचा उद्घाटन समारंभ सोमवार, दिनांक ०५ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता रमाई सदन, शिवाजी नगर सांजा रोड येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जिजाऊ माँ साहेब सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन अंकुश कृष्णाजी भालेराव यांच्या हस्ते संपन्न झाले.




यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्ष अनिता आनंद भालेराव, उपाध्यक्ष शाहीन जाकेर शेख, संस्थेच्या संचालक सुवर्णा जवाहर कांबळे, म हादेवी बाळासाहेब माळी, शैला प्रसाद दसपुते, सोनाली किरण नेटके, छाया हनुमंत मुठाळ, वैशाली अमोल शिंदे, कविता नीलम चंदनशिवे, अंजली आनंद भालेराव, सविता धनंजय बनसोडे, कविता घुले, मीना मगर, मनीषा मस्के, सायरा तांबोळी, शबनम शेख, भावना मेंढे, अश्विनी काळे, सविता मेंढे, इरशाद शेख, अंकुश भालेराव, आनंद भालेराव, अबोली भालेराव आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थितांना श्रीहरी चौहान, भाजपा नेते राजसिंह राजेनिंबाळकर, आनंद भालेराव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वतंत्र मजूर जनरल कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) व युनिक बहुउद्देशीय सामाजिक संघटना तथा क्रेडिट सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक ए. ए. भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार शरीफ शेख यांनी केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माऊली मंदिरातून हैबतरावबाबा दिंडीचे त्र्यंबकेश्वर पायी वारी सोहळ्यास प्रस्थान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, आळंदी (पुणे) :** त्र्यंबकेश्वर पायी वारी दिंडी सोहळ्यास संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे जनक श्री गुरू हैबतरावबाबा यांची विना दिंडीने त्र्यंबकेश्वर पायी वारीस माऊली मंदिरातून हरिनाम गजरात प्रस्थान ठेवले. श्रीगुरु हैबतरावबाबा पायी दिंडी सोहळा सद्गुरू संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ ज्येष्ठ बंधू भेट सोहळा त्र्यंबक पायी वारी त्र्यंबकेश्वरसाठी आळंदी मंदिरातून दिंडी मंदिर प्रदक्षिणा, विना पूजन, श्रींची आरती घेत हरिनाम गजरात मार्गस्थ झाली. या निमित्त माऊलींचे मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत मानाचा वीणा पालखी सोहळा मालक ऋषिकेश आरफळकर पवार यांनी विणेकरी जनार्दन ढाकणे महाराज यांच्याकडे हरिनाम गजरात सुपूर्द केला. यावेळी विना मंडपात प्रथा परंपरेने मालक ऋषिकेश आरफळकर पवार, विणेकरी जनार्दन महाराज यांनी सर्व दिंडीतील वारकऱ्या समवेत पंचपदी केली. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान तर्फे उपव्यवस्थापक तुकाराम माने सरकार यांचे हस्ते विना पूजन झाले.

यावेळी आळंदी जनहित फाउंडेशनचे विश्वस्त स्वामी सुभाष महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. श्रींचे दर्शन, मानकरी यांना श्रीफळ देऊन दिंडीने हरिनाम गजरात माउली मंदिरातून महाद्वार मार्गे नगरप्रदक्षिणा करीत त्र्यम्बक वारीस प्रस्थान ठेवले. अभंग, आरती झाली. हैबतरावबाबा यांचे सेवेकरी, पुजारी संभाजी महाराज यांनी माऊलींची आरती करून दिंडी त्र्यंबकेश्वर कडे मार्गस्थ झाली. या प्रसंगी तुकाराम माने सरकार, स्वामी सुभाष महाराज, शाम कोळपकर, माऊली गुळुंजकर, हैबतरावबाबा दिंडीतील मानकरी, मान्यवर यांच्या उपस्थितीत दिंडी श्री निवृत्तीनाथ महाराज यांचे सोहळ्यास त्र्यंबक वारीला हरिनाम गजरात मार्गस्थ करण्यात आली. पहिला मुक्काम कोहिनकर वाडी येथे होत आहे.

## पत्रकार दिनानिमित्त दिवंगत पत्रकारांच्या स्मृती प्रित्यर्थ माळजाई उद्यान येथे वृक्षारोपण



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, फलटण :** मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण दि. ६ जानेवारी १८३२ रोजी प्रसिद्ध झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिवर्षी दि.०६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. फलटण येथे त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दिनांक ०६ जानेवारी २०२६ रोजी पत्रकार दिनानिमित्त माळजाई उद्यान येथे फलटण शहर व तालुक्यातील दिवंगत पत्रकारांच्या स्मृती प्रित्यर्थ शहर व तालुक्यातील पत्रकार आणि माळजाई उद्यान समिती यांच्या सहभागाने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन अशा एका महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहर व तालुक्यातील दिवंगत पत्रकारांच्या नावाने एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याची योजना तयार करण्यात आली असून दि.०६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता माळजाई उद्यान येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच फलटण येथे शहर व तालुक्यातील पत्रकार आणि सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शासकीय/ निमशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि फलटणकर नागरिकांच्या माध्यमातून अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष, माजी आमदार, शिवसंदेशकार कॉम्रेड हरिभाऊ निंबाळकर चषक क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. दि. ७ व ८ जानेवारी रोजी निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता घडसोली मैदान, फलटण येथे या स्पर्धांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात येणार आहे, त्यानंतर पत्रकार व राजकीय नेते कार्यकर्ते यांच्या संघांमध्ये प्रेक्षणीय क्रिकेट सामना आयोजित करण्यात आला आहे. तरी वृक्षारोपण समारंभास आणि क्रिकेट स्पर्धांच्या उद्घाटन समारंभ व प्रेक्षणीय सामन्यासाठी उपस्थित रहावे, अशी विनंती फलटण शहर व तालुक्यातील पत्रकारांच्यावतीने करण्यात आली आहे.

## विसापुरात ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी सुरेश पंदीलवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील जेष्ठ नागरिकांनी एकत्र येत नुकतीच माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ टोंगे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेतली.

यामध्ये विसापूर जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त शिक्षक सुरेश पंदीलवार यांची तर सचिव पदावर सुरेश इटनकर यांची सर्वानुमते निवड केली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच बंडू गिरडकर, माजी



पंचायत समितीचे सदस्य प्रभाकर टोंगे, अशोक तुराणकर, प्रभाकर कळसकर, रत्नाकर टोंगे, नागोराव कुत्तरमारे, अनंतसुर्गीव वानखेडे, दादाजी जीवने, उलमाले बाबु यांची उपस्थिती होती. गावातील जेष्ठ नागरिकांना आयुष्याच्या उत्तरार्धात भेडसावणाऱ्या समस्या आहे.

या समस्यांचे निवारण करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाची संकल्पना मान्यवरांनी व्यक्त केली. त्यानुसार विसापूर ज्येष्ठ नागरिक संघाची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. विस्तारीत कार्यकारिणीत अध्यक्ष म्हणून सुरेश पंदीलवार, कार्याध्यक्ष प्रभाकर टोंगे, सचिव सुरेश इटनकर, सहसचिव अशोक तुराणकर, उपाध्यक्ष हरिश्चंद्र थेरे, कोषाध्यक्ष रत्नाकर टोंगे, तर सल्लागार म्हणून प्रभाकर कळसकर, शालीक नांदे, रामदास हरणे, सुधीर गिरडकर, सुनिल बुटले, परमेश्वर पुणेकर, संजय डाहुले यांचा समावेश करण्यात आला आहे. सभेचे संचालन अशोक तुराणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेश पंदीलवार यांनी केले.

## स्व.राजमणीबाई गोडसे यांची दहावी पुण्यतिथी साजरी; नेत्र तपासणी, चष्मे वाटप


**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष यांच्या मातोश्री स्व. राजमणीबाई विश्वनाथराव गोडसे यांची दहावी पुण्यतिथी दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी साजरी करण्यात आली आहे. बालाजी गोडसे यांच्या निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त मोफत नेत्र तपासणी, रक्तदाब तपासणी व मधुमेह तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. स्व.राजमणीबाई गोडसे यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी या शिबीराचे आयोजन करण्यात येत असून त्या माजी नगरसेवक कैलास गोडसे यांच्याही मातोश्री होत्या. तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नेत्र तपासणी, मधुमेह तपासणी व रक्तदाब तपासणी केली व पुढील उपचारांसाठी योग्य सल्ला दिला गेला. आज पुण्यतिथीनिमित्त गरजू रग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. स्व.राजमणीबाई गोडसे यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांना अभिवादन करण्यासाठी शहरांतील व परिसरातीलही रुग्णांना या शिबिराचा लाभ घेतला. या कार्यक्रमाला मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली आणि त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

# वढाणे गावच्या हद्दीत बिबट्याच्या हल्यात घोड्याचा बळी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.०५, बारामती :** संपुर्ण महाराष्ट्र हा बिबट्याच्या दहशतीत जगत असल्याचे दिसतं आहे. बारामती तालुक्यातील वढाणे गावामध्ये रविवार, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी बिबट्या सीसीटव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. इनामके वस्ती परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याणे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजीच्या सुमारास या प्राण्याने एका पाळीव घोड्यावर हल्ला करुन त्याला ठार केल्याची घटना घडली. वढाणे परिसरातील एका शेतकर्याच्या विहीरीजवळ लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या सदृश्य प्राण्याची हालचाल कैद झाली आहे. त्यानंतर इनामके वस्ती येथील शेतकरी बबन लकडे यांच्या शेतात बांधलेल्या घोड्यावर या प्राण्याने झडप घातली. घोड्याच्या गळ्यावर हल्ला करुन पाठीमागील भागावर लचके तोडत त्याला फरफटत नेले. काही वेळा नंतर रस्त्या लगत झुडपांच्या कडेला घोड्याचा मृतदेह आढळून आला.



घटनेची माहिती मिळताच मोरगाव प्रादेशिक वनविभागाचे कर्मचारी, बारामती रिस्क्यु टीम व ग्रामस्थांनी घटना स्थळी धाव घेतली. पाहणी दरम्यान जमिनीवर तसेच शेतातील कांदा पिकात प्राण्याच्या पायाचे ठसे स्पष्टपणे दिसून आले.याच भागा लगत कोळोली सीमेवरील हिंगणीगाडा हद्दीत या पुर्वी लोंढे यांच्या गाईवरही हल्ला झाल्याची घटना घडली होती. वढाणे, हिंगणीगाडा व वढाणे - पडवी सीमेवर आढळलेले ठसे लक्षात घेता हे हल्ले एकाच बिबट्या सदश्य प्राण्याचे असण्याची शक्यता वन विभागाने व्यक्त केली आहे.इनामके वस्ती पासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद शाळा कौलेवाडी येथे २० ते २५ विद्यार्थी ये - जा करतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची चिंता पालकां मधे पहायला मिळत आहे. शेतकऱ्यांनीशेती पंपासाठी दिवसा वीजपुरवठा देण्याची मागणी केली आहे.मोरगाव क्षेत्राचे वनपाल शितल बागल, वनरक्षक दयानंद अवघडे, वनसेवक जी.एन.भोंडवे, एस.पी. दिवटे तसेच पुणे येथील रिस्क्यू टीमचे नचिकेत अवधाने यांनी घटनास्थळी भेट दिली.प्राथमिक तपासात घोड्याचा मृत्यू बिबट्या सदृश्य प्राण्याची हल्यात झाल्याची शक्यता असल्याचे वनपाल बागल यांनी सांगितले.

# वरसई हायस्कूलमध्ये सुवर्ण महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

## माजी विद्यार्थ्यांचे प्रेम, स्वागताने माजी अध्यक्ष अँड.बापूसाहेब नेने भारावून गेले

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** शाळेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला सुवर्ण महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन, शिस्तबद्ध नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे, पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष अँड बापूसाहेब नेने, रा.जि.प अध्यक्षा नीलिमा पाटील, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, भाजप महामंत्री वैकुंठ पाटील, दिलीप बापट, समीर साने, अँड.नीता कदम, सुधीर जोशी, श्री.चिंचणीकर, श्री.भट, मुख्याध्यापक विनया पाटील, माजी मुख्याध्यापक एस.के.वाघमारे, अशोक पाटील, शिक्षकवर्ग तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी आकर्षक सजावट, सुवर्ण महोत्सवाची स्मृती जागवणारे छायाचित्र प्रदर्शन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सुवर्ण महोत्सवाचे भव्य आयोजन पाहून संस्थेचे अध्यक्ष भारावून गेले. आपल्या मनोगतात त्यांनी शाळेच्या वाटचालीचा आढावा घेत या भागातील लोकांनी शाळा टिकून ठेवण्याचे मोठे योगदान आहे. आज ही माजी विद्यार्थीचे उपस्थिती पाहून व या संस्थेवर असलेले प्रेम यातून आज स्पष्ट झाले पुढे बोलताना सांगितले की या भागत जूनियर कॉलेज कसे काढता येईल यासाठी प्रयत्न करणार तसेच माजी विद्यार्थ्यांचे यश आणि विद्यमान विद्यार्थ्यांची गुणवत्ता यांचे कौतुक केले. ही शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था नसून समाज घडविण्याचे कार्य करत आहे, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य व गीतांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. माजी मुख्याध्यापक व शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अक्षय पाटील, केतन पाटील, सुजाता जाधव यानी केले शेवटी उपस्थितांनी सुवर्ण महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक समितीचे अभिनंदन केले.




# शिक्षकांना ज्ञानदानाचेच कार्य करू द्या - आ.अडबाले

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे चंद्रपूर जिल्हा अधिवेशन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असून अशैक्षणिक कामांतून शिक्षकांची मुक्तता करून त्यांना ज्ञानदानाचेच कार्य करू द्यावे, असे प्रतिपादन आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. ते चंद्रपूर येथे दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने प्रियदर्शिनी सभागृह येथे आयोजित जिल्हा अधिवेशनात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबईचे सरचिटणीस तथा माजी आमदार विश्वनाथ डायगव्हाणे होते. उद्घाटक म्हणून आमदार ॲड.अभिजित वंजारी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, विमाशि संघाचे अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, विज्युक्टाचे महासचिव डॉ.अशोक गव्हाणकर, जगदीश जुनघरी, विमाशि संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, लक्ष्मणराव धोबे, डॉ.संजय गोरे, प्रविण नाकाडे, डॉ.प्रवीण जोगी, अरविंद राऊत, विनोद पिसे, प्रा.प्रमोद उरकुडे, अनिल गोतमारे, विजय गोमकर, अविनाश बडे, रवींद्र नैताम, महेंद्र सालंकार, आश्रमशाळा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिनेश चौधरी, कार्यवाह किशोर नगराळे, पांडुरंग भालशंकर, भाऊ गोरे, सुरेशकुमार बरे, मनोज आत्राम, प्रमोद साळवे, चेतन हिंगणेकर, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे व मोठ्या संख्येने शिक्षकांची उपस्थिती होती. या अधिवेशनात जुनी पेन्शन योजना लागू करणे, १०-२०-३० योजना माध्यमिक शाळेतील शिक्षकांना लागू करणे, टीईटी संदर्भातील सर्वोच्च न्यायाच्या निर्णयाबद्दल शासनाशी पाठपुरावा करणे, निवड श्रेणी विनाअट लागू करणे, यासह आश्रमशाळा शिक्षकांच्या समस्या, अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या समस्या तसेच विधान परिषदेच्या माध्यमाने शासनाशी केलेला पाठपुरावा याविषयी आमदार सुधाकर अडबाले यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटनीय भाषणात आ.ॲड.अभिजित वंजारी यांनी शिक्षण विभागातील प्रश्न हाताळण्याकडे शासनाचे अक्ष्यम दुर्लक्ष होत असल्याचे मत व्यक्त केले. विमाशी संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू यांनी टप्पावाढ अनुदान, जुनी पेन्शन योजना यावर मत व्यक्त केले.




अध्यक्षीय भाषणात श्री.डायगव्हाणे यांनी विमाशी संघटनेने सुरवातीपासून शिक्षकांच्या हितासाठी आंदोलने केली. तसेच निष्क्रिय शासन धोरणाविरोधात आपला लढा तीव्र करू, असे मत व्यक्त केले. अधिवेशनात सेवानिवृत्त शिक्षक - कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा उपाध्यक्ष आनंद चलाख, मनीषा बोरगमवार यांनी केले.

# १५ जानेवारी रोजी मतदानाकरिता सुट्टी जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, नवी मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि.१५ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील २९ महानगर पालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार असून सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रितीने बजावता यावा, तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेलगतच्या जिल्ह्यामधील सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने दि.३० डिसेंबर २०२५ रोजी शासन परिपत्रक जारी केले असून त्यामध्ये **खालील प्रमाणे आदेश देण्यात आले आहेत :-**

(१) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/ अधिकारी/ कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

(२) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील (उदा. खाजगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी, हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

(३) अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात संबंधित अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

(४) उपरोक्त नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी/ व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनाविरुद्ध कारवाई करण्यात येईल असे या शासन परिपत्रकात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. तरी सदर शासन परिपत्रकाची नोंद घेऊन नवी मुंबईतील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १८ वर्षावरील मतदार नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी किंवा अ.क्र. (३) मध्ये नमूद केल्यानुसार काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात यावी असे सूचित करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## पोरवाल महाविद्यालयात संस्थापक दिन सोहळा ७ जानेवारी ला



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात येत्या ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता दिवंगत सेठ नेमकुमारजी पोरवाल यांचा जन्मदिवस संस्थापक दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद कामठी येथील नगरपरिषदेचे अध्यक्ष माननीय अजय अग्रवाल भूषवतिल तर नागपूर येथील वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. मनोहर कुंभारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. याप्रसंगी दि शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजीवकुमार पोरवाल, उपाध्यक्ष अखिल पोरवाल, कोषाध्यक्ष अभिमन्यु पोरवाल, सचिव विजयकुमार शर्मा, सीईओ प्रा.डॉ.सुधाकर धोंडगे, प्राचार्य प्रा.डॉ.स्वप्नील दहात, कार्यक्रम समन्वयक व उपप्राचार्य प्रा.डॉ.मनीष चक्रवर्ती, उपप्राचार्य डॉ. रेणू तिवारी, आय.क्यू.ए. समन्वयक डॉ.प्रशांत धोंगळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुधीर अग्रवाल, पर्यवेक्षक प्रा.विश्वनाथ वंजारी, परिसरातील मान्यवर, माध्यम प्रतिनिधी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी इत्यादी बहुसंख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य आणि कार्यक्रम समन्वयकांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## अभ्यासक्रम निवडताना स्वत:तील क्षमतांसोबतच दुसऱ्या पर्यायाची जाणीव ठेवणे गरजेचे



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** दहावी बारावीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर स्वतःची आवड, स्वतः मधील क्षमता, आवड असलेल्या अभ्यासक्रमातील उपलब्ध पर्याय, भविष्यात उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी याविषयीचा विचार करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत डॉ.प्रवीण गेडाम यांनी श्रेयश कोचिंग क्लासेसच्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आणि दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले. मागील ३० वर्षापासून सावित्रीबाई फुले जयंती दिनानिमित्त बालिका दिवस व कोचिंग क्लास मधील १० वी १२ तील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्याचा कार्यक्रम श्रेयस कोचिंग क्लास तर्फे राबविण्यात येतो. यावर्षी सुद्धा सावित्रीबाई फुले जयंती दिनाचे औचित्य साधून सदर कार्यक्रमाचे आयोजन विनोद बहादुरे सर द्वारा संचालित श्रेयस कोचिंग क्लासेस, द्वारकापुरी, नागपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मागील वर्षी बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, सोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे ऋणानुबंध कायमच असावे लागतात तेव्हा ते कायम रहावे आणि आपल्या महापुरुषांचे विचार त्यांनी आत्मसात करावे या करिता अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे मत संचालक विनोद बहादूरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शैलेश गायकवाड उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व लक्ष्यात घेऊन पुढील दिशा निश्चित करणे किती गरजेचे आहे या विषयावर मार्गदर्शन केले. श्रेयस कोचिंग क्लास मधील वातावरण हे भावनिक आणि संस्कारक्षम असून विद्यार्थ्यांना भविष्यात वेळप्रसंगी कसे वागावे या विषयी मोलाचे मार्गदर्शन या ठिकाणी मिळत असल्याचे मत कोचिंग क्लास मधील शिक्षक विलास व उदय घारपुरे, राम सुरुसे, संजय मेहरकुरे, अमोल गोंडाणे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन साक्षी वाघमारे व श्रुती नागपुरे या विद्यार्थ्यांनीनी केले तर आभार विलास घारपुरे यांनी व्यक्त केले.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवकांचा सत्कार




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** सामाजिक कार्यात अग्रेसर क्रांतिवीर श्यामलालबाबू श्रीवास स्मृती बहुउद्देशीय संस्था, श्रीवास नगर द्वारे क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले यांच्या जयंती प्रित्यर्थ महादुला नगर पंचायत नवनिर्वाचित नगराध्यक्षा हेमलता मनोज सावजी व सर्व नगरसेवक, नगरसेविकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादुला नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी तर विशेष अतिथी म्हणून संकेतदादा बावनकुळे, मनोज चवरे, प्रितम लोहासारवा, मनोज सावजी, कांचनताई कुथे उपस्थित होते.प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी कु.इंजल नारायण भालेराव अभियांत्रिकी विद्यार्थी व कु. योगेश्री जगणे या ९ व्या वर्गाच्या विद्यार्थीनीने सवित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी उत्कृष्ट अभ्यासपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.यानंतर सर्व पाहुण्यांच्या शुभहस्ते नगराध्यक्षा हेमलता मनोज सावजी, नगरसेवक अभिजित ढेंगरे, राज उईके, गोपालसिंग नैकाने, सचिन वानखेडे, मंगेश देशमुख. नगरसेविका स्वातीताई लांडे, नंदाताई तूरक, वैशालीताई पखीड्डे, गंगाताई जैन, सोनूताई उघडे, संध्याताई साबळे यांचा सन्मान चिन्ह व रोपटे देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संस्था पदाधिकारी राजेश मछले, अमरजीत गोडबोले, नमिता गोडबोले, निकिता लोणारे, मुन्ना मेश्राम, ताराचंद पारधी, पुरण आगासे, हुकूमचंद जनबंधू, घनश्याम मेश्राम, राजू सेवतकर, जितेश भगत, पिंटू चव्हाण, सुधीर धुरिया, निशांत पखीड्डे, लालू उघडे, नाना लांडे, माधव लाडे, धनराज बागडे, सुनील खोब्रागडे, अश्विन जांभुळकर, कमलेश खोब्रागडे, प्रविण घोडेस्वार, काशीराम आगासे, विद्याताई वाघ, कुसुमताई कावळे, लताबाई वाघमारे, आशा यादव, कुसुमताई बंसोड, प्रज्ञा नारनवरे, बबिता वाणी, तेजस्विनी नारनवरे, रेश्मा वानखेडे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेकरिता राजेश बोरकर, राहुल इंगोले, प्रितेश वानखेडे, योगेश मेश्राम, नीतून आगासे, सुमित मेघराज, प्रविण वानखेडे, प्रफुल नारनवरे, विक्की नारनवरे, निरंजन वालदे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक व संस्था सचिव अमरजीत गोडबोले यांनी केले.